# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला

(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)

कृषि नगर, अकोला ४४४१०४ (महाराष्ट्र, भारत)

## COLLEGE OF VETERINARY AND ANIMAL SCIENCES, AKOLA

(MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY, NAGPUR)

Krishi nagar, Opposite Dr. PDKV Campus, Murtijapur Road, Akola 444 104 (Maharashtra, India)

Website: www.covasaklmafsu.ac.in, e-mail: adpgivas@mafsu.ac.in, adcovasakola@mafsu.ac.in


**No. COVAS/AD/Acad/Ans. Book & Supplement/Quotation/ 406 /2026 Date: 5 /06/2026**

## दरपत्रक मागविण्याची सूचना

**विषय:- पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला येथील अधिनस्त शैक्षणिक विभागा अंतर्गत परीक्षा कक्षासाठी उत्तर पुस्तिका व पुरवणी पत्रिका छापून देणेकरिता दरपत्रक पुरविणेबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ नागपुर अंतर्गत, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला येथील शैक्षणिक विभागांतर्गत विद्यार्थ्यांचे परीक्षेकरिता उत्तरपुस्तिका तसेच पुरवणी पत्रिकांची आवश्यकता असते. सदर उत्तर पत्रिका व पुरवणी पत्रिका ही खालील नमूद असल्याप्रमाणे छापून घेण्याविषयी ठरविण्यात आलेले आहे. यासाठी इच्छुक स्थानिक पुरवठादारांकडून यासूचनेद्वारे सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | छपाई करावयाचा तपशील | अंदाजित छापावयाची एकूण संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | उत्तरपुस्तिका /Answer Books (०६ जोडपाणी म्हणजे दोन्ही भागाकडून एकूण १२ पाने) | ४००० | नमूना उत्तर पुस्तिका व पुरवणी पत्रिका उपलब्ध करून देण्यात येईल |
| ०२ | पुरवणी पत्रिका/ Supplement (०२ जोडपाणी म्हणजे दोन्ही भागाकडून एकूण ०४ पाने) | ८००० | |

**अटी व शर्ती:**

१) सदर उत्तरपुस्तिका व पुरवणी पत्रिका विशिष्ट पद्धतीने छपाई आवश्यक असल्याने, उपरोक्त नमूद असल्याप्रमाणे प्रती उत्तरपुस्तिका व पुरवणी पत्रिकांचे दर सर्व कागद खरेदी, छपाई, मजुरी खर्च व करांसहीत नमूद करावे व **सदर दर हे दरपत्रक अंतीमीकरण झाल्याच्या दिवसापासून सहा महिन्याकरीता वैध राहतील याची नोंद घ्यावी**.

२) दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहतील.

३) दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत "**उत्तरपुस्तिका छपाई करुण पुरवठ्यासाठी दरपत्रक**" असे लिहावे.

४) दरपत्रकावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.

५) दरपत्रकासोबत हमीपत्र जोडावे. हमीपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

६) दरपत्रकासोबत इतर पूरक कागदपत्र जोडावे (उदा. पन कार्ड / आधार कार्ड/ जीएसटी नोंदणी)

७) सीलबंद दरपत्रके सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, मूर्तीजापूर रोड, कृषिनगर, अकोला-४४४१०४ या पत्यावर दिनांक **१५ जुन**, २०२६ **च्या सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

**सहयोगी अधिष्ठाता**

**प्रत:** १) सूचना फलक : पवैपविम, अकोला

२) प्रभारी, वेबसाइट, पवैपविम, अकोला यांना विनती करण्यात येते कि त्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर सदर जाहिरात प्रसिद्धीस द्यावी.